**महाराष्ट्र शासन**
**विधि व न्याय विभाग**
**क्रमांक: डीएमसी-१२२६/प्र.क्र.९१ /कार्या-१**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक : ०९ जून,२०२६

**आदेश**

श्रीमती वर्षा आनंदा साळुंखे, सहायक संचालक, वित्त विभाग यांची, विधि व न्याय विभागाच्या अधिपत्याखालील देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर या कार्यालयातील सचिव या पदावर खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून तीन वर्षाच्या कालावधीकरीता प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे.

(अ) श्रीमती वर्षा आनंदा साळुंखे, सहायक संचालक, वित्त विभाग ज्या तारखेला प्रतिनियुक्तीच्या पदावर रूजू होतील त्या तारखेपासून प्रतिनियुक्तीच्या सेवेचा प्रारंभ होईल आणि ती सेवा ज्या तारखेला ते आपल्या शासकीय पदाचा कार्यभार पुन्हा स्वीकारतील, त्या तारखेला समाप्त होईल.

(ब) जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने शासनाला आवश्यक वाटली तर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्यांना परत बोलावून घेण्याचा अधिकार शासन / सक्षम प्राधिकाऱ्यास राहील.

(क) जर त्यांची सेवा स्वीयेत्तर नियोक्त्याला आवश्यक वाटली नाही, तर त्यांना मूळ विभागाकडे परत पाठविण्याची मुभा स्वीयेत्तर नियोक्त्याला राहील. मात्र याप्रमाणे परत पाठविण्यापूर्वी स्वीयेत्तर नियोक्त्याने शासनाला / सक्षम प्राधिकाऱ्याला तीन महिन्यांची नोटीस दिली पाहिजे; आणि

(ड) त्यांनी मूळ विभागाकडे परत जाण्याचा आपला उद्देश आहे, अशी कमीत कमी तीन महिन्यांची लेखी नोटीस शासनाला / सक्षम प्राधिकाऱ्याला दिल्यानंतर त्यांना मूळ विभागाकडे परत येण्याची मुभा राहील.

(इ) त्यांच्या प्रतिनियुक्तीने नियुक्तीच्या अनुषंगाने शासन निर्णय दि. १७.१२.२०१६ व दि.१६.०२.२०१८ मधील तरतूदी लागू राहतील.

२. श्रीमती वर्षा आनंदा साळुंखे यांची सचिव या पदावरील नियुक्ती म.ना.से. (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा....इ.) नियम १९८१ मधील नियम ४० आणि या नियमांच्या परिशिष्ट-२ मध्ये नमूद अटी व शर्ती यांच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

३. श्रीमती साळुंखे यांच्या इतर सर्व प्रशासकीय बाबी वित्त विभागामार्फत हाताळण्यात येतील.

४. श्रीमती साळुंखे यांना, विधि व न्याय विभागाच्या अधिपत्याखालील देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर या कार्यालयातील सचिव या प्रतिनियुक्तीच्या पदावर रूजू होण्याकरिता वित्त विभागाने तात्काळ कार्यमुक्त करावे.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०६०९१३०५०२०९१२ हा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात आले आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

SAGAR JAGDISH BONDRE

Digitally signed by SAGAR JAGDISH BONDRE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Law and Judiciary Department,
2.5.4.20=758E680C096816E7BC8C5CFA4D68A0A2C4BF018A47792BA2218CFC8931BAFB94, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=FBFC75851717C6A4821D7E342915AFB63273FFBA8DB7B62A81FFC78124ACD737, cn=SAGAR JAGDISH BONDRE
Date: 2026.06.09 13:06:09 +05'30'

**(सागर जगदिश बोंद्रे)**

**उप विधि सल्लागार नि उप सचिव**

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अ.मु.स/ प्रधान सचिव.
२. मा.राज्यमंत्री, विधि व न्याय यांचे खाजगी सचिव.
३. अप्पर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई.
४. प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई.
५. प्रधान सचिव (ले. व को.) वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई.
६. प्रशासक, देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर.
७. उपसचिव, विधि व न्याय विभाग(का.१६),मंत्रालय, मुंबई
८. उपसचिव, वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई.
९. श्रीम.वर्षा आनंदा साळुंखे, सहायक संचालक, वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई.
१०. निवडनस्ती कार्या-१६.